तरुण भारत ■ बुधवार, ११ मे २०२२

# दोडामार्ग हळबे कॉलेज विद्यार्थ्यांची जंगल भ्रमंती



कुंभवडे : विद्यार्थ्यांना माहिती देताना वनरक्षक अरुण खामकर. सोबत संजय सावंत, तुषार देसाई, संजय नाटेकर व अन्य. समीर ठाकुर

दोडामार्ग : दोडामार्ग तालुका निसर्गसंपन्न असल्याने देशभरातील हौशी अभ्यासकांची पावले या जंगलाकडे कायमच वळतात. त्यामुळे दोडामार्गच्या हळबे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या जंगलात भ्रमंती करत प्राणी, पक्षी निरीक्षणाचा आनंद तळकट, भेकुर्ली व कुंभवडे येथील जंगलात घेतला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुभाष सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली भूगोल विभाग प्रमुख डॉ. पी. डी. गाथाडे यांनी या निसर्ग भ्रमंतीचे आयोजन केले होते. त्यामध्ये ४२ विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी आणि जंगलाची माहिती असणारे अनेक अभ्यासक सहभागी झाले होते. सकाळी ६ वाजता या जंगलात निसर्गाची आवड असणारे ४२ विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी दाखल झाले. त्यांच्या मदतीला दोडामार्ग वनविभागाचे वनरक्षक अरुण खामकर, बाळकृष्ण सावंत, प्रकाश गवस, वनश्री फाऊंडेशनचे संजय सावंत, संजय नाटेकर, तुषार देसाई उपस्थित होते.

यावेळी जंगलांमध्ये महाराष्ट्राचा राजपक्षी हरियाल, महाराष्ट्राचे फुलपाखरू ब्ल्यू मॉरमॉन, शेकरू, धनेश पक्षी, रानडुकराच्या पाऊलखुणा व अन्य पक्षी आढळून आले, अशी माहिती संजय नाटेकर आणि अरुण खामकर यांनी दिली. तर आघाडा, वेत, कणकीचे कोंब, कलिंगण, तमालपत्री, कडीपत्ता व इतर वनस्पतीची माहिती संजय सावंत, तुषार देसाई यांनी दिली. या सहलीत विद्यार्थ्यांबरोबरच प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, डॉ. पी. डी. गाथाडे, प्रा. दिलीप बर्वे, प्रा. प्रशांत ढेपे, डॉ. एस. यू. दरेकर, प्रा. सोपान जाधव, प्रा. रामकिसन मोरे, डॉ. राजेंद्र इंगळे, डॉ. संजय खडपकर, प्रा. श्रीपाद पाडगावकर, प्रा. प्रीती प्रसादी, किरण नाईक, कल्पेश गवस, तुकाराम शेटकर, संजय गावकर आदी कर्मचारी सहभागी झाले होते.